| | | | |
|---|---|---|---|
| MHKO100009332021 | दाखल दिनांक | :- | २०/१०/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | :- | २०/१०/२०२१ |
| | निकाल दिनांक | :- | ०१/०६/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०४ ०७ १२ |

**नियमीत फौजदारी खटला क्र. २६०/२०२१** **निशाणी क्र. २२/ब.**

**फॉर्म क्र.३२**
**भाग 'अ'**
**( निकालाचे शिर्षक पृष्ठ )**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| **गडहिंग्लज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी : एस. डी. मेहता )**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०१ जून, २०२६<br>**(नियमीत फौजदारी खटला क्र. २६०/२०२१)** | | |
| गुन्हा नोंद क्र.१८८/२०२१, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज. | | |
| **फिर्यादी / तक्रारदार** | :- | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत दुय्यम निरीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज. |
| **अभियोग पक्षातर्फे** | :- | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. डी. मोरे. |
| **आरोपी** | :- | **अल्लाबक्ष नबिसो पिंजारी,**<br>वय वर्ष - ३८, व्यवसाय - शेती,<br>रा. निलजी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. डी. बी. नागोंडा.** |

**भाग-ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २८/०९/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २८/०९/२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २०/१०/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २६/०८/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ३०/१२/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करणेबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अल्लाबक्ष नबिसो पिंजारी. | २८/०९/२०२१ | २८/०९/२०२१ | म.दा.कायदा कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | भैरु मारुती नाईक. | पंच | ९ |
| २. | संदिप बाबूराव चौगुले. | फिर्यादी | १५ |
| ३. | गणेश नामदेव गुरव. | तपासी अंमलदार | १८ |

### क. अभियोग पक्षातर्फे निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १० | पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराची सही. |
| २. | १२ | रासायनिक विश्लेषण अहवाल. |
| ३. | १६ | फिर्याद. |
| ४. | १७ | दिनांक २९/०९/२०२१ रोजीचे न्याय सहा. वैज्ञानिक प्रयोगशाळ यांना पाठविलेले पत्र. |
| ५. | १९ | जप्ती पंचनामा. |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०१/०६/२०२६ रोजी घोषित केला)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

०२. दिनांक २८/०९/२०२१ रोजी मौजे निलजी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे आरोपी बिगर परवाना, बेकायदा स्वतःचे फायदयाकरीता एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली. च्या २४ सिलबंद बाटल्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला. म्हणुन, आरोपीविरुध्द राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज येथे तक्रार नोंदविण्यात आली.

०३. सदर तक्रारीवरुन राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज येथे गु.र.क्र. १८८/२०२१, महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. तपासी अधिकारी, जी.एन.गुरव यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपास पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.७ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोप नोंदवून आरोप निश्चित केला. सदरचा दोषारोप आरोपीला वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरीक्षेची मागणी केल्याने खटल्याची पुढील संपरिक्षा करण्यात आली.

०५. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण ३ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाने निशाणी क्र.२० येथे पुरावा संपल्याबाबतची पुरसीस दाखल केली आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन निशाणी क्र.२१ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने त्याचे बचावात खोटी फिर्याद दाखल केल्याचे कथन केले आहे.

०६. अभियोग पक्षातर्फे श्री. एस. डी. मोरे, सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील श्री. डी. बी. नागोंडा. यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखातील साक्षीपुराव्यावरुन खालील प्रश्न खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाल्याने त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक २८/०९/२०२१ रोजी मौजे निलजी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे आरोपी बिगर परवाना, बेकायदा स्वतःचे फायदयाकरीता एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली. च्या २४ सिलबंद बाटल्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला असे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | **नाही.** |
| **२.** | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ बाबत -**

०७. अभियोगपक्षाने सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकूण ३ साक्षीदारांस तपासले व इतर कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला.

०८. अभियोग पक्षातर्फे सदर गुन्हा शाबीत करण्याकरीता तपासण्यात आलेले सा.क्र.२ संदिप बाबूराव चौगुले हा सदर गुन्ह्यातील फिर्यादी असून त्याने त्याच्या पुराव्यादरम्यान कथन केले आहे की, तो सन २०२१ साली राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज येथे जवान या पदावर कार्यरत असताना दिनांक २८/०९/२०२१ रोजी गुप्त माहिती मिळाली की, निलजी येथे एक इसम दारुची चोरटी विक्री करीत आहे. त्यानुसार तो, पंच व इतर अधिकारी असे सर्वजण सरकारी वाहनाने माहितीच्या ठिकाणी गेले. बातमीच्या ठिकाणी जावून अचानकपणे छापा टाकला असता, तिथे एक इसम एका जुनी कापडी पिशवीसह संशयीरित्या उभा मिळुन आला. त्या पिशवीची तपासणी केली असता, त्यामध्ये देशी दारु संत्राच्या १८० मिलीच्या २४ सिलबंद बाटल्या मिळुन आल्या. त्या इसमाला

ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अल्लाबक्ष नबिसो पिंजारी, रा.निलजी, ता.गडहिंग्लज असे सांगितले. जप्त मुद्देमालापैकी दोन १८० मिलीच्या सॅम्पल बॉटल काढून त्यावर साहेबांच्या व पंचाच्या सहयांचे कागदी लेबल चिकटवुन त्याला लाखेने सील केले. सदर इसमावर जागीच गुन्हा नोंद करुन त्याला समजपत्रावर जागेवर सोडण्यात आले. जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठांनी आपल्या ताब्यात घेतला. पंचनामा जागेवर पुर्ण केला. नंतर त्याने स्वतः सरकारतर्फे फिर्याद (नि.१६) दिली. त्यानंतर, दिनांक २९/०९/२०२१ रोजी वरिष्ठांनी जप्त नमुन्यापैकी एक बाटली त्याच्या ताब्यात प्रपत्रासह (नि.१७) दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासात कथन केले आहे की, घटनास्थळी ते दुपारी २.३० च्या सुमारास पोहोचले. फिर्यादीमध्ये सदरची वेळ नमुद केलेली नाही. घटनास्थळाच्या चतुःसिमा त्याला आठवत नाहीत. घटनास्थळाची जागा कुणाच्या मालकीची आहे त्याची चौकशी त्यांनी केली नाही. घटनास्थळ पंच हे त्यांचे नेहमीचे आहेत. तसेच, सदर साक्षीदाराने इतर विचारण्यात आलेल्या प्रश्नांची नकारात्मक उत्तरे दिली.

०९. सा.क्र.३ गणेश नामदेव गुरव यास अभियोग पक्षाने तपासी अंमलदार म्हणुन तपासले असून त्याने त्याचे पुराव्यादरम्यान असे कथन केले आहे की, सन २०२१ मध्ये तो दुय्यम निरिक्षक, गडहिंग्लज येथे कार्यरत असताना दिनांक २८/०९/२०२१ रोजी त्याला गुप्त बातमी मिळाली की, निलजी गावच्या हद्दीत एक इसम बेकायदेशिरपणे देशी दारुची विक्री करीत आहे. त्यानंतर, भिकाजी पाटील व भैरु नाईक अशा दोन पंचांना कार्यालयात बोलवून घेऊन छापा टाकण्याचा आशय समजावुन सांगितला असता त्यांनी संम्मती दिली म्हणुन तो, दोन पंच व इतर कर्मचारी असे सरकारी वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेले. बातमीच्या ठिकाणी पायी चालत जाऊन छापा टाकला असता एक इसम त्याचे ताबेकब्जात कापडी पिशवी घेऊन उभा असल्याचे त्यांना दिसून आला. त्यानंतर, त्याला जागीच पकडून त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नांव अल्लाबक्ष नबीसो पिंजारी, रा. निलजी असे सांगितले. सदर व्यक्तीची तपासणी केली असता त्याचेकडून देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या २४ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. त्याला

जागीच अटक केली आणि जप्त मुद्देमालापैकी २ नमुना बाटल्या प्रयोग शाळेकरीता काढून घेतल्या. नंतर घटनास्थळी दोन पंचांसमक्ष पंचनामा (निशाणी क्र.१९) केला. त्यानंतर, आरोपीला ४१-अ प्रमाणे समजपत्र देऊन जागेवर सोडले. त्यानंतर, सरकारतर्फे चौगुले जवान यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. त्यानंतर, दिनांक २९/०९/२०२१ रोजी नमुना बाटली प्रपत्र निशाणी १७ सह प्रयोगशाळेत पाठविली. त्यानंतर, प्रयोगशाळेचा अहवाल निशाणी १२ अभिलेखावर दाखल केला. तपास पुर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल केले. त्याच्या तपासात निष्पन्न झाले की, आरोपी हा घटनेच्या दिवशी बेकायदेशिर दारुची विक्री करीत होता. सदर साक्षीदाराने उलटतपासात कथन केले आहे की, घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे याबाबत त्याने चौकशी केली नव्हती. ते ज्या गुन्हयात तपास करतात त्या सर्व गुन्हयातील मुद्देमाल एकाच ठिकाणी ठेवत असल्याचे त्याने मान्य केले. त्याने तपासादरम्यान मुद्देमाल घेऊन जाणा-या कर्मचा-याचा स्वतंत्र जबाब नोंदविलेला नाही. घटनास्थळ पंच त्यांचे नेहमीचे आहेत. तसेच, सदर साक्षीदाराने इतर विचारण्यात आलेल्या प्रश्नांची नकारात्मक उत्तरे दिली.

१०. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी व तपासी अंमलदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत घटनेबाबत कथन केलेले आहे. परंतु, त्यांच्या साक्षीच्या समर्थनार्थ पुरावा म्हणुन अभियोग पक्षाने इतर कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा नोंदविलेला नाही. अभियोग पक्षाने पंचनाम्यावरील पंच सा.क्र.१ भैरु मारुती नाईक यास तपासले असून त्याने त्याचे पुराव्यादरम्यान दिनांक २८/०९/२०२१ रोजीच्या पंचनाम्यावरील त्याचे स्वाक्षरी (नि.१०) व्यतिरिक्त इतर संपूर्ण मजकूराचे खंडन केले. त्याने त्याच्या सरतपासात तो पोलीसांसोबत कोठेही गेला नव्हता व त्याच्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही असे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारास उलटतपासात विचारता येतील असे सुचक प्रश्न विचारले. परंतु, सदर साक्षीदाराने तो पोलीसांसोबत पंचनामा

करण्यासाठी गेला नव्हता व त्याच्यासमक्ष पंचनामा केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे, सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द होत नाही. यावरुन, अभियोग पक्षाने कथन केल्याप्रमाणे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला अथवा कसे हे स्पष्टपणे शाबीत होत नाही. म्हणुन, फक्त फिर्यादीच्या साक्षीवर विसंबुन राहुन आरोपीविरुध्द निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.

११. पंच साक्षीदाराने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास उपयोगी अशी साक्ष न्यायालयासमोर न दिल्यामुळे सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द झालेला नाही. अन्य पुराव्यातून देखील आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल मिळून आला हे अभिलेखावर आलेले नाही. सबब, आरोपीच्या कब्ज्यातून सदरचा मुद्देमाल मिळून आला ही बाब सिध्द होऊ शकली नाही.

१२. प्रस्तुत प्रकरणात आरोपी विरुध्द गुन्हा सिध्दतेकामी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल या न्यायालयासमोर अभियोगपक्षाने दाखल केलेला आहे. मात्र वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्या साक्षीदारासमक्ष आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला होता त्या साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य न केल्यामुळे सदर जप्त मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त केला व सदर दाखल रासायनिक विश्लेषण अहवाल त्याबाबतच आहे अथवा कसे यावर शंका निर्माण होते. त्यामुळे, तपासणीसाठी पाठविलेला मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आला होता व तोच रासायनिक प्रयोगशाळेत पाठविणेत आला ही महत्त्वाची बाब सबळ पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही.

१३. वरील सर्व कारणांचा विचार करता आरोपी त्याच्या ताब्यात विनापरवाना, बेकायदा एका पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २४ सिलबंद बाटल्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळून आला हे दोषारोप निःसंशयपणे तसेच सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे. परिणामी प्रश्न क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र.२ साठी</u> -

१४. वरील विवेचनेच्या अनुषंगाने प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, प्रश्न क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**०१)** आरोपी **अल्लाबक्ष नबिसो पिंजारी** यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**०२)** आरोपीचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**०३)** जप्त मुद्देमाल देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मि.ली.च्या २४ सिलबंद बाटल्या अपील कालावधी समाप्तीनंतर नियमाप्रामाणे योग्य त्या विल्हेवाटीकरीता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज यांचेकडे पाठविण्यात याव्यात.

**०४)** प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक पिशवी हिचा अपील कालावधी समाप्तीनंतर जाहीर लिलाव करुन त्याची रक्कम सरकार जमा करणेत यावी.

**०५)** आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अनुसार रक्कम रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे बंधपत्र देऊन अभियोगपक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

**०६)** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता, क्रिमीनल ॲप्लीकेशन नं. ३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस.टी) नं.३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.06.01 16:35:14 +0530

दिनांकः ०१/०६/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, गडहिंग्लज.